सोमवार
दि. २९ ऑगस्ट २०२२
मुल्य २ /- रूपये
पृष्ठ ४
वर्ष ५ वे अंक ३५

RNI. MAHMAR/2018/77866
मराठी साप्ताहिक

# सह्याद्रीचा राखणदार

www.sahyandrinews.com
संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे



## काळजी करू नका, सर्वतोपरी मदत करणार : मंत्री सुधीर मुनगंटीवार

### घुग्गुस येथील भूस्खलन पिडीतांना दिला धीर

### धोका असलेल्या घरांना मुख्यमंत्री सहायता निधीतून तात्काळ १० हजार रुपये मिळणार.



**चंद्रपूर/प्रतिनिधी**
घुग्गुस येथील आमराई वार्डात घडलेली भूस्खलनची घटना अतिशय गंभीर आहे. सुदैवाने यात कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र परिसरातील इतर घरांनासुद्धा असा धोका राहण्याची शक्यता नाकारता येत नाही. भूस्खलनाचा धोका असलेल्या घरांना मुख्यमंत्री सहायता निधीतून तात्काळ १० हजार रुपये देण्यात येईल, असे राज्याचे वने व सांस्कृतिक कार्यमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी सांगितले.

घुग्गुस येथे भूस्खलन झालेल्या नामदेव मडावी यांच्या घराची पाहणी करून नागरिकांशी संवाद साधताना ते बोलत होते. यावेळी त्यांनी नागरिकांना धीर दिला. तसेच चिंता करू नका, सर्वतोपरी मदत केली जाईल, असेही आश्वस्त केले.

पुढे मंत्री मुनगंटीवार म्हणाले, आजूबाजूच्या घरांनासुद्धा अशा प्रकारचा धोका असल्याने नागरिकांच्या घरातील सामान काढून त्यांना वेकोलीच्या निवासी वसाहतीत शिफ्ट करावे. अन्यथा दुसरीकडे राहण्याची व त्यांच्या जेवणाची, स्वच्छतेची व आदी बाबींची व्यवस्था वेकोलीने करावी. यात कोणतीही हयगय होऊ देऊ नये. तसेच जिल्हा सामान्य रुग्णालयामार्फत नागरिकांची आरोग्य तपासणी त्वरित करून घ्यावी. घरसामान स्थलांतरीत करण्यासाठी पक्षातर्फे स्वतःहून २५ मजूर लावण्यात येईल. एवढेच नाही तर तातडीची मदत म्हणून धोका असलेल्या कुटुंब प्रमुखांना प्रत्येकी तीन हजार रुपये त्वरित देण्याच्या सूचना त्यांनी देवराव भोंगळे यांना दिले.

घडलेल्या घटनेबाबत डायरेक्टर जनरल ऑफ माइनिंग सेफ्टी यांना त्वरित बोलवावे. यासंदर्भात लवकरच उच्चस्तरीय बैठक घेऊन उपाययोजनाची दिशा निश्चित करण्यात येईल. धोका असलेल्या घरांची यादी जिल्हा प्रशासनाने फायनल करावी. धोक्यातील घरांना रेड बोर्ड लावून डेंजर एरिया मार्क करावा. घुग्गुस येथील घटनेबाबत केंद्रीय वने आणि पर्यावरण मंत्री भूपेंद्र यादव, कोळसा मंत्री प्रल्हाद जोशी यांच्यासोबत बोलणी केली जाईल. तसेच राज्याच्या मुख्यमंत्र्यांना सुद्धा अवगत करून घडलेल्या घटनेची चौकशी केली जाईल. ज्या घरांना धोका आहे, अशा कुटुंबाला मुख्यमंत्री सहायता निधीतून प्रत्येकी १० हजार रुपये मिळवून देऊ, असे त्यांनी सांगितले.

संपूर्ण परिसराचा नकाशा पाहून वेकोलीने पोकळ जागेतील खड्डा रेती किंवा अन्य मटेरियल टाकून त्वरित भरावा. वेकोलीमुळे जीवाला धोका असल्यामुळे येथील नागरिकांनी पुनर्वसनाचा प्रश्न उपस्थित केला आहे. वेकोली आणि म्हाडाची मदत घेवून नियमानुसार पुनर्वसन करता येईल का, याची पडताळणी सुद्धा केली जाईल. याबाबत जिल्हाधिकाऱ्यांनी आढावा घ्यावा, असेही मुनगंटीवार म्हणाले.

यावेळी जिल्हाधिकारी अजय गुल्हाने, विकोलीचे महाप्रबंधक आभास सिंग, तहसीलदार निलेश गौंड, देवराव भोंगळे, मुख्याधिकारी सूर्यकांत पिदुरकर, पोलिस निरीक्षक बबन फुसाटे, नायब तहसीलदार सचिन खंडारे तसेच नितु चौधरी, निरीक्षण तांड्रा, संजय तिवारी, संतोष नुने, सिणू इसारप, रत्नेश सिंह, संजय भोंगळे, मल्लेश बल्ला, वैशाली ढवस, सुनीता पाटील, सुनंदा लिहितकर, विनोद चौधरी, अजगर खान, तुलसीदास ढवस, विवेक तिवारी, सुरेंद्र भोंगळे, विनोद जंजरला, अमोल थेरे, रवी बोबडे, कोमल ठाकरे, मनमोहन महाकाली, मलेश बल्ला, महेश लठ्ठा उपस्थित होते.

*संबंधित वृत्त (पान/४)*

---

गोंडवाना विद्यापीठ नि व ड णू क विशेष

## गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली प्राधिकरण निवडणूक - २०२२

## गोंडवाना विद्यापीठ शिक्षण मंच तथा अखिल भारतीय विद्यार्थी परिषद

**आजच्या स्पर्धेच्या युगात जगभरातील विद्यापीठांना 'क्यू. एस.' तसेच 'टाईम हायर एज्युकेशन' यासारख्या नामवंत संस्था मानांकन देत असतात. या स्पर्धेचे आव्हान भारतातील सर्वच विद्यापीठांसमोर आहे. विद्यापीठाच्या शैक्षणिक व प्रशासकीय गुणवत्तेचे महत्व आपण ओळखणे ही काळाची गरज आहे. शिक्षणाचा व प्रशासनाचा दर्जा सुधारुनच विद्यापीठाला नावलौकीक मिळू शकतो. त्यावरच आपली भविष्यातील वाटचाल अवलंबून आहे. या नव्याने स्थापन झालेल्या विद्यापीठात दर्जेदार शिक्षण मिळावे यासाठी गोंडवाना विद्यापीठ शिक्षण मंच समर्पित आहे.**



**डॉ.यशवंत घुमे**
**मो. ९८२२२३३९१२**





गोंडवाना विद्यापीठ शिक्षण मंच ही गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोलीच्या परिक्षेत्रात उच्च व तंत्र शिक्षण क्षेत्रात राष्ट्रहित, अध्यापक व विद्यार्थी हित आणि विद्यापीठाच्या संवैधानिक मार्गाने विकास साध्य करणारी शिक्षक संघटना असुन 'राष्ट्र के हित में शिक्षा, शिक्षा के हित मे शिक्षक' तथा 'शिक्षक के हित मे समाज' या त्रिसूत्री संकल्पनांच्या आधारे राष्ट्रहित आणि प्राथमिक शिक्षण ते उच्चतर शिक्षण क्षेत्राचा विकासात सतत योगदान देण्यास सतत प्रयत्नशील आसणाऱ्या अखिल भारतीय राष्ट्रीय शैक्षणिक 'महासंघ, नवी दिल्ली, उच्च शिक्षा संवर्ग आणि अखिल भारतीय राष्ट्रीय शैक्षणिक महासंघ, उच्च शिक्षा संवर्ग 'महाराष्ट्र प्रांत या राष्ट्रीय आणि राज्यस्तरीय संघटनांशी संलग्नित गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोलीच्या परिक्षेत्रातील एकमेव संघटना आहे.

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोलीच्या निर्मितीमध्ये या संघटनेच्या पदाधिकाऱ्यांची तसेच विद्यापीठाच्या निर्मितीपासून तर आज पर्यंत विद्यापीठाच्या विकासात गोंडवाना विद्यापीठ शिक्षण मंचाची भूमिका अत्यंत महत्त्वाची राहिली आहे

गोंडवाना विद्यापीठ शिक्षण मंच शिक्षणाचे भारतीयत्व टिकवून जागतिकीकरणाच्या युगात आपला विद्यार्थी मागे राहू नये यासाठी सदैव प्रयत्नशील आहे. गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोलीच्या द्वितीय अधिसभेसाठी विविध प्राधिकरणांच्या निवडणूका येत्या सप्टेंबर महिन्यात होत आहे. प्राध्यापकांचे प्रश्न सोडविणे, विद्यापीठाला उच्च शैक्षणिक गुणवत्ता प्राप्त करुन देणे, विद्यार्थ्यांच्या हितासाठी कार्यरत असणे आणि विद्यापीठाला भविष्यात योग्य दिशा देणे या उद्देश्यांनी शिक्षण मंच या निवडणूकांना सामोरे जात आहे. शिक्षण मंचाच्या उच्च विद्या विभुषित उमेदवारांना प्रथम पसंतीचे मत मिळवून विजय प्राप्त करण्यासाठी अध्यक्ष प्राचार्य डॉ.पी. अरूण प्रकाश व महामंत्री डॉ. रूपेंद्रकुमार गौर यांच्या मार्गदर्शनाखाली संघटनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते अहोरात्र परिश्रम घेत आहेत.या संघटनेतर्फे डॉ. रूपेंद्रकुमार गौर, डॉ. धनराज खानोरकर, डॉ. अशोक खोब्रागडे, डॉ. अशोक मिस्त्री, डॉ. छगन मुंगमोडे, डॉ.अनिल चहांदे, डॉ. प्रकाश वट्टी, डॉ.संजय भुतमवार, डॉ. आशिष महातळे, डॉ.प्रगती नरखेडकर, डॉ. रक्षा धनकर, डॉ.युवराज मेश्राम, प्राचार्य डॉ.अरुणप्रकाश पी, प्राचार्य डॉ. मृणाल काळे आणि प्राचार्य डॉ. सुरेश बाकरे उभे आहेत.


---

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर गोंडवाना विद्यापीठ टीचर्स असोसिएशन, सेक्युलर असोसिएशन आणि राष्ट्रवादी प्राध्यापक संघ

**मागील पाच वर्षात या संघटनेच्या पॅनलच्या सिनेट सदस्यांनी सभागृहात प्राध्यापकांचे, विद्यार्थ्यांचे तसेच विद्यापीठाच्या विकासासाठी अनेक प्रश्न लावून धरले. आणि सातत्याने त्याचा पाठपुरावा करून प्राध्यापकांना व विद्यार्थ्यांना न्याय मिळवून देण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला आहे. मागील सिनेटमध्ये केलेल्या कामाच्या आधारावर यावेळी निवडणुकीत सेक्युलर पॅनलच्या माध्यमातून पुनश्च मतदारांच्या दारापर्यंत ही संघटना पोहचली असून आपल्या मागील कामाच्या आधारावर यावेळीही प्राध्यापकांनी निवडून द्यावे अशी विनंती करीत आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठ टीचर्स असोसिएशनने विविध उपक्रमांच्या माध्यमातून प्राध्यापकांच्या मनात घर केले आहे. विशेषतः एम.फिल., नेट सेट उत्तीर्ण प्राध्यापक व विद्यार्थी यांना गोंडवांना विद्यापीठातील पीईटी परीक्षेतून सूट मिळवून देण्यात यश मिळाले आहे. प्राध्यापकांची स्थाननिश्चिती वेळेत करण्याबाबत सातत्याने पाठपुरावा करण्यात आला. प्राध्यापकांच्या किरकोळ रजा आठ ऐवजी दहा मंजूर करून घेण्यात यश मिळविले. कोरोना काळातील प्राध्यापकांच्या हक्काच्या सुट्यांमध्ये कपात करण्यात आली होती.त्या लागू करून घेण्यात यश मिळविले. प्राध्यापकांच्या बेकायदेशीर निलंबनाच्या विरोधात आवाज उठवून न्याय मिळवून दिला.**



**डॉ.यशवंत घुमे**
**मो. ९८२२२३३९१२**





विद्यापीठाच्या कामकाजानिमित्त जाणाऱ्या प्राध्यापकांना समितीचे चेअरमन व सदस्यांना देण्यात येणाऱ्या प्रवास भत्तांमध्ये तफावत होती ती एकसमान करून घेण्यात यश मिळविले. विद्यापीठाद्वारे मेजर रिसर्च प्रोजेक्ट सर्व संलग्नित महाविद्यालयाच्या प्राध्यापकांसाठी लागू करण्यात यश प्राप्त केले. विद्यापीठातील बेकायदेशीर भरती प्रक्रिया थांबवून प्राध्यापकांना न्याय मिळवून दिला. गोडवाना विद्यापीठाचे चंद्रपूर येथे उपकेंद्र सुरू करण्यात यावे यासाठी सातत्याने पाठपुरावा केला. विद्यापीठात डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्ययन केंद्र व आदिवासी अध्ययन केंद्र मंजूर करून घेण्यात यश आले. आदिवासी क्रीडा संकुल मान्य करून शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यात यश आले. विद्यार्थ्यांकरिता चंद्रपूर येथे सुविधा केंद्र उपलब्ध करून घेतल्यामुळे विद्यार्थ्यांच्या आर्थिक भुर्दंड कमी झाला. अहेरी येथे विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठाचे सुविधा केंद्र सुरू करण्यासाठी पाठपुरावा केला. हिंदुस्तान पेट्रोलियमच्या माध्यमातून चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्यातील १३ महाविद्यालयातील एससी, एसटी, ओबीसीच्या हजारो विद्यार्थ्यांना तीन कोटी तेरा लाखाची शैक्षणिक शिष्यवृत्ती मिळवून दिली. हिंदुस्थान पेट्रोलियमच्या माध्यमातून १३ महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांकरिता १७ वॉटर कुलर, १७ वेंडिंग मशीन व १५ संगणक उपलब्ध करून देण्यात आले. विद्यार्थ्यांसाठी क्यूआर कोड अंकसूची लागू करण्यात करून घेण्यात आली त्यामुळे विद्यार्थ्यांचे डॉक्युमेंट व्हेरिफिकेशन करून घेणे सर्वांसाठी सोयीस्कर झाले. विद्यार्थ्यांच्या फी वाढीसंदर्भात सातत्याने आवाज उठवून विद्यार्थ्यांना न्याय मिळवून दिला.

या निवडणुकीत संघटनेला यश मिळाले तर प्राध्यापक व विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना सिनेट सभागृहात वाचा फोडण्यासाठी व त्यांना न्याय हक्क मिळवून देण्यासाठी यापुढे ही संघटना कार्यरत राहणार असल्याचे संघटनेचे अध्यक्ष डॉ. सुधाकर पेटकर यांनी सांगितले. पीएच.डी. संशोधन करणाऱ्या प्रोफेशनल तसेच नॉन प्रोफेशनल विद्यार्थ्यांची विद्यापीठाने वाढवली फी कमी करण्याबाबत पाठपुरावा करणे, परीक्षेत अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांची फेर मूल्यांकनासाठी भरलेली फी त्या विद्यार्थ्यांच्या फेरमूल्यांकनानंतर गुण वाढल्यास विद्यार्थ्याला परत मिळवून देण्यासाठी पाठपुरावा करणे,

विद्यार्थ्यांची आरआरसी समितीची सभा वर्षातून तीन ते चार वेळा नियमित घेण्यासाठी पाठपुरावा करणे, गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली येथे माननीय सहसंचालकांचे कार्यालय सुरू करण्याबाबत पाठपुरावा करणे, युजीसी- एचआरडीसी अंतर्गत रिफ्रेशर व शॉर्ट टर्म वर्ग सुरू करण्यासाठी ॲकाडमीक स्टाफ कॉलेज विद्यापीठात सुरू करण्याबाबत पाठपुरावा करणे, प्राध्यापकांच्या स्थान निश्चितीमध्ये पारदर्शकता येण्यासाठी प्लेसमेंट कॅम्प लावबाबत पाठपुरावा करणे, प्राध्यापकांना हिवाळी अवकाशकालीन सुट्या एक महिना तसेच उन्हाळी अवकाशकालिन सुटया दीड महिना करण्याबाबत सिनेटमध्ये पाठपुरावा करणे, विद्यापीठ परीक्षेमध्ये केंद्राधिकारी सह केंद्राधिकारी व पर्यवेक्षक व इतर कर्मचारी यांना मिळणारे मानधन अतिशय अल्प असल्यामुळे मानधनात वाढ करण्यासाठी पाठपुरावा करणे, विद्यापीठात कामकाजासाठी गेलेल्या विद्यार्थ्यांच्या व प्राध्यापकांच्या निवासाकरिता विद्यार्थी भवन तसेच शिक्षक भवन निर्माण करण्यासाठी पाठपुरावा करणे, विद्यापीठात विद्यार्थ्यांकरिता प्लेसमेंट ऑफिसची नियुक्ती करण्याबाबत पाठपुरावा करणे, विद्यार्थ्यांची डिग्री वेळेवर वेळेवर न देऊ शकत असल्यास ऑनलाईन प्रोव्हिजनल डिग्री देण्यात यावी यासाठी पाठपुरावा करणे, विद्यापीठाचे डिजिटल लॉकर सुरू करणे, विद्यापीठाची डिजिटल कामगार पद्धती अद्यावत करणे, संशोधन पेपर प्रकाशित करण्यासाठी विद्यापीठाद्वारे दर्जेदार रिसर्च जनरल सुरू करण्याबाबत पाठपुरावा करणे, गोंडवाना विद्यापीठाचे स्वतःचे स्टेटस तयार करणेबाबत पाठपुरावा करणे, मागील सिनेट सभागृहात मंजूर करण्यात आलेली कामे पूर्णत्वास नेणे, रोजगाराभिमुख अभ्यासक्रम सुरू करण्याबाबत पाठपुरावा करणे, विद्यापीठांमध्ये व महाविद्यालयांमध्ये प्राध्यापकांची तसेच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची रिक्त पदे भरण्याबाबत पाठपुरावा करणे यासाठी प्रयत्न केले जाणार असल्याचे जाहिरनाम्यात सांगितले आहे. या संघटनेतर्फे डॉ. संजय बेले, डॉ. कुलदीप गौंड, डॉ. देवेश कांबळे, डॉ. एस. बी. किशोर, डॉ. एन. एस. वाढवे, डॉ. प्रमोद शंभळकर, डॉ. रमेश हलामी, डॉ. विश्वनाथ राठोड, डॉ. ममता ठाकूरवार, डॉ.अमृत लांजे, डॉ विमल दखने, डॉ. शैलेंद्रकुमार शुक्ला उभे आहेत.

# पालकांनी मुलांना झेपतील एवढ्याच अपेक्षा ठेवाव्यात

नुकत्याच नीट / जेईई परीक्षा आटोपल्यात. लवकरच निकाल हाती येतिलही. मुलांपेक्षा पालकांमध्येच बेचैनी जास्त पहावयास मिळत आहे . प्रत्येक पालकांनी आन्सरशीट वरुन आपापल्या पाल्यांचा स्कोअर चेक करुन पाहिल्यानंतर पुढील पैशा-पाण्याच्या नियोजनाला सुरवात देखिल केलेली आहे . प्रत्येकच पालकांना विशेषतः ज्यांच्या मुलांचे स्कोअर मनासारखे येतील अशी अपेक्षा केलेली आहे त्यांच्या पाल्यांचे स्कोअर कदाचित निराश करु शकतात . ज्याला एम बी बी एस ची आशा आहे त्याला बीडीएस किंवा बीएएमएस वर समाधान मानावे लागू शकते किंवा ज्यांना आयआयटी ची आशा आहे त्यांना इतर ऑटोनॉमस किंवा रेप्यूटेड इंजिनिअरींग कॉलेजेस वरच समाधान मानावे लागू शकते . यापलीकडे थोडाफार स्कोअर हुकला तर रिपिटची तयारी सुद्धा ठेवावी लागते . आणि या सर्व गोष्टी पार पडेपर्यंत पालकांना आपल्या मुलांवर विनाकारण कशाही प्रकारचा ताण येणार नाही याची काळजी घेण्याची फार मोठी जबाबदारी असते . ही जबाबदारी पालक म्हणून जर व्यवस्थित सांभाळता आली नाही तर आपल्या पाल्यांच भविष्य अस्थिर करण्यासाठी सुद्धा आपणच जबाबदार रहाणार आहोत हे सत्य स्विकारण्याची तयारी ठेवायला हवी .




प्रत्येक पालकांना आपल्या पाल्यांच्या भाविष्याची चिंता असतेच . बरेचदा याचा मुलगा इकडे गेला, त्याचा तिकडे गेला तर माझाही इकडे गेलाच पाहिजे हा अट्टाहास मुलांवर अन्यायच होऊ शकतो . एखाद्या पालकाला माझा मुलगा किंवा मुलगी एमबीबीएस ला सिलेक्ट व्हावी अस वाटत असेल तर त्यात काही नवल नाहीच. पालकाची मुलांच्या शिक्षणावर पैसा लावण्याची तयारी असूनच उपयोग नसतो तर आपल्या मुलाच्या मनात नेमकं कशात करीअर करण्याची इच्छा आहे याकडे दुर्लक्ष करुन पालकांनीच मुलांच्या शिक्षणाच्या दिशा ठरवणं हे कधीकधी मुलांच्या जीवावर बेतल्याच्या अनेक घटना आपण वर्तमान पत्रात वाचत असतोच . जिथे माझ्या मुलांनी हेच केलं पाहिजे हा अट्टाहास पालकांकडून केला जातो तिथे मुलं मन मारुन बापाच्या इच्छेसाठी प्रयत्न करतातही पण त्याच्या मनातल्या इच्छा त्याला माराव्या लागतात. अर्धवट मनाने बापाच्या इच्छा पूर्ण करण्यासाठी निघालेली मुलं त्यांच्या प्रयत्नात यशस्वी होण्याचे प्रमाण फार कमी आहे. उलट अभ्यासात जेमतेम असणाऱ्या मुलांना त्यांच्या आवडी नुसार



**गोपाल भा. गुडधे, वरोरा**
**मो.७२१८१३८३७९**


जर पुढे जाण्याची संधी मिळाली तर ९५टक्के वाल्यापेक्षा हा ५०टक्के वाला आयुष्यात सफल झालेला पहावयास मिळतो . आज ११ वी १२ वी साठी नीट / जेईई परिक्षांची तयारी करता यावी म्हणून पालक याच दोन वर्षात चार ते पाच लाखांचा खर्च करतात. चांगल्या रेप्यूटेट इन्टीट्यूट मध्ये आपल्या पाल्यांना प्रवेश मिळवून देतात. या संस्था पक्क्या व्यावसायिक असल्यामुळे एकाच बॅचमध्ये चारचारशे विद्यार्थ्यांना अक्षरशः कोंबतात . त्यातील ठरवून पहिल्या शंभर विद्यार्थ्यांवरच मेहनत घेतात . त्यातही यशस्वी होणाऱ्यांच प्रमाण हे चार ते दहा टक्के . म्हणजे एका बॅचमधून जवळपास ९० टक्के विद्यार्थी गव्हर्मेंट साठी सिलेक्ट होणार नाहीच . आणि प्रायवेट चांगल्या कॉलेजसाठी मुलगा सिलेक्ट झालाही तरी बाप येणाऱ्या खर्चासाठी पुरणार नाही. एकंदरीत मुलगा सिलेक्ट झाला नाही म्हणून बापं सगळ खापर मुलावरच फोडणार हे माहित असल्यामुळं मुलं बापाला खरी माहिती सांगण्यासाठी अक्षरशः घाबरतात. रिझल्ट हाती आल्यावर मुलं बापाला तोंड दाखविण्याची हिम्मत करु शकत नाही . जी १०टक्के मुल यशस्वी होतात त्या मुलांना सॅल्यूटच आहे . पण उरलेली ९०टक्के मुलं ही अपेक्षांमध्ये न उतरल्यामुळे पालकांना परत रिपीट चा विचार किंवा मिळालं त्यात समाधान यापैकी एकाची निवड करावी लागते . मुलांच्या अपयशानंतरच खरी पालकांची परीक्षा असते . अशा ९० टक्के मुलांबाबत निर्णय घेत असतांना पालक आणि मुलांमध्ये मैत्रीपूर्ण संवाद घडून येणं गरजेचं असते .

हा संवाद घडून आला तरच तशाही परिस्थितीत मुलांना त्यांचा मार्ग व्यवस्थित निवडता येऊ शकतो . फक्त पालकांनी एखाद्या गोष्टीचा अट्टाहास सोडून मुलांशी मैत्री करण्याची गरज आहे. आपल्या मुलांना स्वतःच्या अपेक्षांच्या ओझ्याखाली दाबून टाकू नका . इतरही बरेच क्षेत्र करिअरसाठी वाट बघताहेत . सर्व ऑप्शन्स खुले असू द्या .

# बैल पोळा व तान्हा पोळा निमित्त टिपलेले छायाचित्र





















# विश्वकर्मा नगरमध्ये तान्हा पोळा उत्साहात साजरा

**भद्रावती / प्रतिनिधी**

सर्वोत्तम तान्हा पोळा उत्सव समिती विश्वकर्मा नगर भद्रावती यांच्या वतीने दि. २७ ऑगस्ट रोज शनिवारला विश्वकर्मा नगर भद्रावती येथे तान्हा पोळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून सेवानिवृत्त शिक्षक रेखाते गुरूजी हे उपस्थित होते तर प्रमुख म्हणून माजी नगराध्यक्ष सुनिल नामोजवार, भास्कर झोडे, विलास बोबडे, पुरूषोत्तम देठे, शामराव दिकोंडवार, भास्कर कोमेजवार, निलेश गुंडावार हे उपस्थित होते.

पाहुण्यांच्या हस्ते मारूतीच्या मूर्तीचे पुजन करून तान्हा पोळ्याचे उद्घाटन करण्यात आले. मंडळाच्या वतीने विविध १८ बक्षिसांची लयलूट करण्यात आली.



उत्कृष्टनंदी बैलसजावटी करीता रोख रक्कम बक्षीस म्हणून देण्यात आले. तसेच मंडळाच्या वतीने सहभागी झालेल्या प्रत्येक मुलांना पाण्याची बॉटल प्रात्साहन पर बक्षिस म्हणून देण्यात आले. तान्हा पोळ्यात २२५ नंदीबैल होते. आकर्षक सजलेले नंदीबैल अन् नटलेले चिमुकले यामुळे सगळीकडे मुलांची कौतूक होत आहे. कार्यक्रमा करिता सर्वांनी सहकार्य केले. उत्साहापूर्ण वातावरणात तान्हा पोळा साजरा करण्यात आला.

# विद्यापीठात पुस्तकी ज्ञानापेक्षा प्रॅक्टिकल नॉलेज महत्वाचे : डॉ. सागर वझे

**भद्रावती / प्रतिनिधी**

गोंडवाना विद्यापीठांतर्गत येणाऱ्या चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्यात आदिवासी बहुल क्षेत्र असल्यामुळे येथील खेळाडूंमध्ये स्पोर्टचे नॅचरल जिन्स आहेत. आणि मी ऑर्थोपेडिक सर्जन आणि स्पोर्टस सायन्स या विभागांमध्ये तज्ज्ञ डॉक्टर असल्यामुळे या खेळाडूंना प्राविण्यप्राप्त करण्यासाठी माझी भरपूर मदत मिळेल असे विचार डॉ. सागर वझे यांनी व्यक्त केले. ते स्थानिक विवेकानंद महाविद्यालयात



आपली पदवीधर मतदार निवडणूक संदर्भात आपली भूमिका मांडत होते. यावेळी मंचावर वाणिज्य विभागप्रमुख डॉ. विजय टोंगे, ग्रंथालय विभागप्रमुख डॉ. सुधीर आष्टुनकर, कनिष्ठ महाविद्यालयातील प्रा.नरेंद्र लांबट विराजमान होते.पुढे बोलताना डॉ. वझे म्हणाले की, प्रत्येक विद्यापीठांमध्ये रिसर्च सेंटर असायला पाहिजे. जिथे भारतातील मोठमोठ्या कंपन्या आपले रिसर्च करून तेथील विद्यार्थ्यांना रिसर्च कामात उपयोगी आणून पुढे नोकरीच्या संधी प्राप्त होतील. तसेच स्किल लेबर तयार करण्यासाठी विद्यापीठात प्रॅक्टिकल स्किल एज्युकेशन दिले तर त्यांना नोकऱ्या मिळायच्या संधी मोठ्या प्रमाणावर उपलब्ध होतील. विद्यार्थ्यांना प्रॅक्टिकल नॉलेज दिल्यामुळे पुस्तकी ज्ञानापेक्षा जास्त उपयोगी पडेल असे विचार व्यक्त केले. या कार्यक्रमाचे संचालन आणि आभारप्रदर्शन इंग्रजी विभागातील प्रा. मोहित सावे यांनी केले.

# बैल पोळा व तान्हा पोळा निमित्त टिपलेले छायाचित्र































## तान्हा पोळा

पोळ्याच्या दुसऱ्या दिवशीचा दिवस म्हणजे तान्हा पोळा. लहान बालके आपल्या पालकांच्या मदतीने लाकडी बैलांची नयनमनोहर सजावट करून तान्हा पोळ्यात आणतात.हा तान्हा पोळा वार्डातील मोकळ्या मैदानावर भरविल्या जातो.

तान्हा पोळा कसा सुरु झाला? याविषयी याविषयी जाणून घेण्याची अनेकांना उत्सुकता असेल. तो कसा सुरु झाला? कोणी सुरु केला? त्याचा उद्देश काय? वगैरे वगैरे प्रश्न सर्वसामान्य नागरिकांना पडतात. याविषयी उपलब्ध माहितीच्या आधारे जाणून घेण्याचा प्रयत्न करू या.

प्राप्त माहितीनुसार तान्हा पोळ्याची परंपरा केवळ विदर्भातच मोठ्या प्रमाणात दिसून येते.श्रीमंत राजे द्वितीय राजे रघूजी भोसले यांनी इ.स.१८०६ मध्ये ही परंपरा सुरू केली. कारागिरांकडून अनेक लाकडी बैल तयार करवून घेतले आणि परिसरातील बालगोपालांना वाटले आणि सर्वांना ती रंगवून सजवून घेवून येण्यास सांगितले. निश्चीत केलेल्या ठिकाणी परिसरात साजसजावट केलेले नंदीबैल घेऊन तिथे सर्व आल्यानंतर राजे रघूजी महाराज भोसलेंनी सर्व बालगोपालांना खाऊ वाटून सर्वांना बक्षिसे दिलीत. तेव्हापासून तान्हा पोळ्याची प्रथा सुरू झाली. हळहळू प्रथेत काहीप्रमाणात बदल होत गेले. यावेळी नंदीबैल सजावट स्पर्धा आयोजित करून सजावटीच्या आधारावर पुरस्कार दिले जात आहे . आज स्पर्धेत नंबर यावा अथवा बालकांचे मनोरंजन खेळ विरंगुळा व्हावा एवढाच उद्देश दिसतोय.

२१६ वर्षाआधी सुरू केलेली ही प्रथा श्रीमंत राजे रघूजी भोसले यांनी या उद्देशातून केलेली असावी की,महाराष्ट्र कृषीप्रधान देश आहे. येथील ८०टक्के माता-पिता शेतीत राबराब राबणारे आहेत.तेव्हा या लहान लहान मुलांना बैलाचे महत्व समजावे. अगदी लहानपणापासूनच या बालकांच्या ह्रदयात बैलांविषयी प्रेम, जिव्हाळा, आपुलकी निर्माण व्हावी. जेणेकरून मोठे झाल्यानंतर त्यांना जीवंत बैलांप्रती आस्था, आदर, कृतज्ञता वाटत राहील. सोबतच माता-पित्यांच्या अथक श्रमाची जाणीव राहील.मुले सदैव आपल्या आईवडिलांच्या मदतीला तत्पर राहतील. या शेती व्यवसायात लक्ष घालतील. श्रीमंत राजे रघूजी महाराज भोसले यांचे वारस राजे मुधोजी भोसले यांच्या सिनीअर भोसला पॅलेस महाल येथील वास्तव्यात आजही ८ फूट उंच व ६ फूट लांबीचा लाकडी बैल सुशोभित आहे. त्याच्या पायात चांदीचा तोडा घातलेला आहे हे उल्लेखनीय.



# आ. किशोर जोरगेवार यांनी अधिकाऱ्यांसह केली घुग्घुसची पाहणी

## अधिकाऱ्यांना केल्या सूचना

**चंद्रपूर / प्रतिनिधी**

वेकोलिच्या खाणी लगत असलेल्या घुग्घुस येथील अमराई वार्डात भूस्खलन झाल्याने गजानण मडावी यांचे घर चक्क ६० ते ८० फुट आत गेल्याची घटना घडली. घटनेची माहिती होताच आमदार किशोर जोरगेवार यांनी अधिकाऱ्यांसह जाऊन घटनास्थळाची पाहणी केली. यावेळी आमदार किशोर जोरगेवार यांनी अधिकाऱ्यांना महत्वाच्या सूचना केल्या आहे. यावेळी नायब तहसीलदार खंडारे, मंडळ अधिकारी नवले, घुग्घुस पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक पुसाटे यांच्यासह संबंधित अधिकाऱ्यांची उपस्थिती होती.

मडावी यांचे अर्ध्यापेक्षा जास्त घर या घटनेत खड्यात गेले आहे. पाहणी दरम्याण आमदार किशोर जोरगेवार यांनी जवळपासचा परिसर खाली करण्याचे निर्देश प्रशासनाला केले आहे. सदर नागरिकांच्या राहण्याची व भोजनाची व्यवस्था करण्याच्या सुचनाही यावेळी आमदार किशोर जोरगेवार यांनी प्रशासनाला केल्या आहे.

परिसर खाली झाल्यावर येथे चोरी सारख्या घटना घडु शकतात त्यामूळे येथे पोलिस उपलब्ध करुन देण्याचे निर्देश यावेळी त्यांनी पोलिस निरिक्षकांना दिले आहे. सदर परिसरातील वीज पुरवठा



खंडित करण्याच्या सुचनाही त्यांनी महावितरण विभागाला केल्या आहे. सदर घटनेची माहिती वेकोलीचे वणी एरियाचे मुख्य महाप्रबंधक आभासचंद्र सिंग यांना दिली आहे. वेकोलीनेही त्यांच्या सुरक्षा रक्षक व आपत्ती व्यवस्थापनाच्या पथकाला येथे तात्काळ पाचारन करण्याच्या सुचना आमदार किशोर जोरगेवार यांनी केल्या आहे. घर खड्डयात गेल्याने आर्थिक नुकसान झालेल्या कुटुंबाचीही आ. जोरगेवार यांनी भेट घेतली असून पिडीत कुटुंबाला मदत करण्याच्या सूचना यावेळी त्यांनी केल्या आहेत.

## भुस्खलनाने घराचे नुकसान झालेल्या मडावी कुटंबाला यंग चांदा ब्रिगेडच्या वतीने जिवनावश्यक वस्तुंची मदत

आमदार किशोर जोरगेवार यांच्या सुचनेनंतर भुस्खलनाने घर जमीनीत शिरल्याने आर्थिक नुकसान झालेल्या कुटुंबाची यंग चांदा ब्रिगेडच्या पदाधिकाऱ्यांनी भेट घेतली असुन सदर कुटुंबाला जिवनावश्यक वस्तुंची मदत केली आहे. यावेळी यंग चांदा ब्रिगेडचे घुग्घुस शहर संघटक विलास वनकर, स्वप्नील वाढई, मुन्ना लोढे, प्रेम गंगाधरे, राजु सुर्यवंशी, इरशाद कुरेशी, उषा अगदारी, नितु जयस्वाल, जोसना मस्के, सुनिता चुने, कामिनी देशकर, वंदना निखारे, सुनिता कोटावार, यंग चांदा ब्रिगेडच्या महिला प्रमुख व शहर संघटिका वंदना हातगांवकर, सविता दंडारे, सायली येरणे, आशा देशमुख, अल्का मेश्राम, भाग्यश्री हांडे, विमल काटकर, वंदना हजारे, आदींची उपस्थिती होती.

वेकोलिच्या वणी एरिया जवळ असलेल्या अमराई वार्डातील गजाणन मडावी यांचे घर भुस्खलनाने ८० ते १०० फुट जमीनीच्या आत शिरले. या घटनेची माहिती मिळताच आमदार किशोर जोरगेवार यांनी घटनास्थळाला भेट देत परिस्थितीची पाहणी केली होती. यावेळी सदर कुटुबांच्या घराचा अर्ध्याहून अधिक भाग जमीनीच्या आत गेल्याने जीवनावश्यक वस्तूंचे मोठे नुकसान झाले. त्यामुळे सदर कुटुंबाला जिवनावश्यक वस्तुंची मदत करण्याच्या सूचना आमदार किशोर जोरगेवार यांनी यंग चांदा ब्रिगेडच्या घुग्घुस विभागाला केल्या होत्या. त्यानुसार यंग चांदा ब्रिगेडच्या वतीने सदर कुटुंबाला गॅस सिलेंडर शेगडी, अन्नधान्य किट, कपडे, गादी, घरगुती वापरातील भांडे, चादर यासह इतर जिवनावश्यक वस्तुंची मदत केली आहे.

# प्राध्यापकांच्या हक्कांसाठी लढणारी प्राध्यापक संघटना : नुटा





**लोकशाहीत न्याय व हक्क मिळवण्यासाठी संघटनेची नितांत आवश्यकता असते. 'जे राव न करी ते गाव करी' अशी एक म्हण आहे. म्हणजेच जे हक्क एकट्याने जमत नाही ते संघटितपणे एकत्र येऊन मिळवता येतात. याची प्रचिती प्राध्यापकांचे प्रभावशाली संघठन असलेल्या नुटा या संघटनेच्या कार्याचा आलेख बघून आल्याशिवाय राहत नाही. वेळोवेळी शासनाच्या प्राध्यापक विरोधी निर्णयांना कायद्यांचा आधार घेऊन या संघटनेने अनेक प्राध्यापकांना त्यांचे हक्क व अधिकार मिळवून दिले. अमरावती, नागपूर व गोंडवाना विद्यापीठांतर्गत प्राध्यापकांच्या विविध प्रकारच्या तांत्रिक अडचणी समजून घेणारी आणि योग्य व कायदेविषयक मार्गानें लढे देणारे संघठन म्हणून नुटा. हे संघठन विद्यापिठीय प्राध्यापकांत लौकिकप्राप्त आहे. संघटन कौशल्याचा वापर करून व सनदशीर मार्गाने लढे देत अनेक प्राध्यापकांचे उध्दवस्त होणारे संसार या संघटनेने वाचवून खऱ्या अर्थाने प्राध्यापकांचे हित जोपासणारे संघटन म्हणून विद्यापीठीय शिक्षकांच्या ह्रदयात मानाचे स्थान प्राप्त केले आहे. आदरणीय शिक्षक आमदार बी. टी. देशमुख यांच्या मार्गदर्शनात संघटनेची घोडदौड सुरू आहे.**

नूटा या संघटनेची स्थापना इसवी सन १९६३ मध्ये झाली असून संघटनेचे प्रमुख उद्दिष्टे हे प्राध्यापक वर्गासाठी विविध स्तरावरून न्याय मागण्यासाठी लढा देण्याचे आहे. शिक्षकांच्या संघटनांनी तीव्रतेने व तर्कशुद्ध पद्धतीने आपले प्रश्न मांडल्याशिवाय व त्या प्रश्नांच्या तीव्रतेचे प्रमाण लक्षात घेऊन तेवढ्याच तीव्र स्वरूपाचे आंदोलन उभे केल्याशिवाय त्यांचे प्रश्न सुटत नाही हे खरे आहे. व्यवसायिक जीवनाच्या दृष्टीने महत्त्वाच्या प्रश्नांची तर्कशुद्ध पद्धतीने निवड करणे, निवड केलेल्या प्रश्नांची शास्त्रीय आधारावर मांडणी करणे, प्रश्नांच्या सोडवणुकीसाठीची तीव्रता आपल्या सदस्यांच्या लक्षात आणून देणे, ज्यांचे प्रश्न त्यांना सोडवावे लागतात हे खरे असले तरी ढोबळ मानाने प्रश्नांच्या तीव्रतेबाबत समाजमनामध्ये जाणीव निर्माण करणे, या समाजाचा भाग असलेल्या आपल्या विद्यार्थ्यांच्या मनाचा कल सांभाळणे, हे शिक्षक संघटनांसाठी महत्त्वाचे काम असते. याकरिता नुटा संघटनेमार्फत विविध समस्यामार्गी लावण्याकरिता विविध ठिकाणी धरणे आंदोलने, तर काही ठिकाणी कायदेशीर मार्गाचा अवलंब करून ते सोडविण्याचा प्रयत्न प्राध्यापकांच्या या संघटनेने केलेले आहेत.

२००५ नंतर लागलेल्या सर्व प्राध्यापक ना तसेच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू केली पाहिजे. यासाठी ८ मे, २०२२ च्या सभेत एम फुक्टोद्वारे सर्वानुमते ठराव घेण्यात आला व यासाठी सर्वच स्तरावरून विविध संघटनांच्या माध्यमातून जुनी पेन्शन योजना लागू करण्यासंदर्भात प्रा. बी. टी. देशमुख यांच्या नेतृत्वात लढा उभारण्याचा ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला. नवीन शैक्षणिक धोरण व



**डॉ. यशवंत घुमे**
**मो. ९८२२२३३९१२**

प्राध्यापकांचे हित जोपासणे ही महत्त्वाची भूमिका नुटा संघटनेतर्फे पूर्ण केली जाईल. यूजीसी रेग्युलेशनची संपूर्णपणे अंमलबजावणी हा सुद्धा एक महत्त्वाचा भाग नुटातर्फे मांडण्यात आलेला आहे, यामध्ये साधारणतः ३२ ठिकाणी ज्या चुका करण्यात आल्या त्या तात्काळ दुरुस्त कराव्या यासाठी नुकताच दहा टप्प्यातील आंदोलनाचा भाग संपलेला आहे.

नुकताच २३ ऑक्टोबर १९९२ ते ०३ एप्रिल २००० पर्यंत लागलेल्या प्राध्यापकांना पेन्शन किंवा निवृत्तिवेतन मिळणार नाही. याबाबत जो लढा नुटा संघटना तसेच एमफुक्टो द्वारे पुकारला गेला. त्यादरम्यान लागलेल्या प्राध्यापकांना निवृत्ती वेतनापासून वंचित ठेवता येणार नाही असा स्पष्ट निर्वाळा मा. सर्वोच्च न्यायालयाने दिला. तसेच ते केवळ नेट/ सेट परीक्षा उत्तीर्ण झाले नाही म्हणजे निवृत्ती वेतन देय नाही. याबाबत शासनाला लवकरात लवकर निवृत्तीवेतन अदा करण्याचे आदेश दिले. या संदर्भामध्ये निवृत्ती वेतनधारकांना निवृत्तीवेतन अदा करण्यास विलंब लावू नये असा स्पष्ट निर्वाळा मा. सर्वोच्च न्यायालयाने प्राध्यापकांच्या बाजूने दिला.

तसेच नेट सेट परीक्षा पास नसलेल्या प्राध्यापकांना कॅसचे बेनिफिट किंवा फायदे देण्यात यावे याबाबतही माननीय सर्वोच्च न्यायालयात संघटनेने अर्ज दाखल करून घेतला आहे. परंतु सद्यस्थितीत फक्त महत्त्वाचे कार्य सुरू असल्यामुळे याकरिता कोविड काळात विलंब होत आहे. प्राध्यापकांचा एक महत्त्वाचा प्रश्न जो ७१ दिवसाच्या संपकालीन पगाराचा होता तो सुद्धा नुटा या संघटनेमार्फत तसेच एमफुक्टोद्वारे सोडविल्या गेलेला आहे. ७१ दिवसाच्या पगाराविषयी हायकोर्टामध्ये जी पिटीशन टाकली गेली. त्यावर मा. हायकोर्टाने लवकरात लवकर ७१ दिवसाचे पगार देण्याचे करावे असे आदेश दिले. व ते दिले नाही तर ८ टक्के व्याजाने ते द्यावे असे आदेश देऊन प्राध्यापकांना ते प्राप्त करण्यामध्ये संघटनेचा मोलाचा वाटा आहे.

नूटा संघटनेतर्फे मा. उच्च, नागपूर खंडपीठ यांच्या आदेशानुसार प्रत्येकी प्राध्यापकांना १८ टक्के व्याजानुसार ७१ दिवसाचा पगार मिळालेला आहे. म्हणजेच ७१ दिवसाचा पगार हा १३८३७७ होता तर त्यावर व्याजासहित मिळालेली संपूर्ण रक्कम एकूण १८६८०९ इतकी १८ टक्के व्याजाने महाराष्ट्र शासनाला अदा करावी लागली.

समाजकार्य

महाविद्यालयातील प्राध्यापकांना साधारणत २०२१ पर्यंत कुठल्याही प्रकारचा सातवा वेतन आयोग देण्यात आलेला नव्हता. मात्र ०३ जानेवारी २०१९ ला या संदर्भामध्ये नूटा संघटनेद्वारे शिक्षक भवन अमरावती विद्यापीठ येथे एकमताने निर्णय घेऊन मा. उच्च न्यायालयात दाद मागण्याचा निर्णय घेण्यात आला. महाराष्ट्र शासनाने २२ ऑक्टोबर २०१९ रोजी सातव्या वेतन आयोगाचा जीआर काढून वेतन आयोग घोषीत केला. या प्रक्रियेमध्ये ॲड. फिरदोस मिर्जा यांनी संघटनेतर्फे बाजू मांडली. नुटा संघटनेतर्फे सद्यस्थितीत सातव्या वेतन आयोगाचे फायदे जे एम. फिल. व पीएचडी इन्क्रिमेंटच्या स्वरूपात होते. ते बंद करण्यात आल्याबद्दल मा. उच्च न्यायालयात याबाबतची याचिका १८ नोव्हेंबर २०२१ ला सादर करण्यात आली. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या अधिसूचने प्रमाणे प्राध्यापकांनाही बेनिफिट देण्यात यावे असे प्रमुख्याने नुटा संघटनेतर्फे मांडण्यात आले.

गोंडवाना विद्यापीठांतर्गत प्राध्यापकांच्या विविध मागण्या सोडविण्याचे कार्य सुद्धा या संघटनेद्वारे झालेले आहे. यामध्ये प्राध्यापकांना मिळणाऱ्या सुट्टया त्यानंतर कोरोना काळात काही प्राध्यापकांचे जिल्हा बंदीमुळे पगार थांबलेले होते. त्यांचीही सोडवणुक संघटनेद्वारे केलेली आहे. एम. फिल. प्राध्यापकांना व होम सायन्सच्या प्राध्यापकांना कॅसचे लाभ मिळण्यासाठी संघटनेद्वारे वेगवेगळ्या स्तरावरून प्रयत्न केले गेले.

प्राध्यापकांच्या निर्माण होणाऱ्या विविध समस्या सोडविण्याकरिता संघटना हिरीरीने लक्ष देत असून वेळोवेळी निर्माण होणारे प्रश्न व समस्या प्राधान्याने सोडविण्याच्या प्रयत्न करीत असते. संघटनेचे नेतृत्व अध्यक्ष डॉ. प्रवीण रघुवंशी, सचिव डॉ. नितीन कोगरे, उपाध्यक्ष डॉ. अजित जाचक, सहसचिव डॉ. पुरुषोत्तम बोरकर, चंद्रपूर जिल्हा अध्यक्ष डॉ. योगेश दूधपचारे, सचिव प्रा. टिकाराम कोसे, गडचिरोली जिल्हा अध्यक्ष डॉ. जयदेव देशमुख व सचिव डॉ. बाळकृष्ण कोंगरे व इतर पदाधिकारी यासंदर्भात अविरत कार्य करीत आहेत. नुटा संघटनेतर्फे डॉ. पुरुषोत्तम बोरकर, डॉ. प्रवीण जोगी, डॉ. योगेश दूधपचारे, डॉ. हितेंद्र धोटे, डॉ. राजेश खेरानी, डॉ. शोभा भुरभुरे, डॉ. दिवाकर उराडे, डॉ. जयदेव देशमुख, डॉ. अनिल थुल, डॉ.दिवाकर कुमरे, डॉ. राजेंद्रकुमार डांगे, डॉ दिलीप चौधरी हे उभे आहेत.

# गोंडवाना विद्यापीठ यंग टीचर्स असोसिएशन





**प्राध्यापक व विद्यार्थी यांच्या न्याय हक्कासाठी व त्यांच्या विविध समस्यांच्या सोडवणुकीसाठी गेल्या ३० वर्षांपासून विद्यापीठ व शासनस्तरावर लढा देणारी संघटना म्हणून नोंदणीकृत असलेल्या नागपूर विद्यापीठ यंग टीचर्स असोसिएशनचा नावलौकिक आहे. प्राध्यापकांच्या अनेक प्रश्नांमध्ये संघटना अविरतपणे लढा देत असून बहुजन, दलित आदिवासी, मागासवर्गीय व सर्वस्तरीय प्राध्यापकांच्या सर्वांगीण विकासासाठी व हितासाठी ही संघटना आधारस्तंभ बनली आहे. पुढे होऊ घातलेल्या या निवडणुकीत यंग टिचर्सचे तीन उमेदवार डॉ. तात्याजी गेडाम, डॉ. रविंद्र केवट, डॉ. विजय वाढई अविरोध निवडून आले आहेत. निवडणुकीत सुरूवातीला विजयाची मुहूर्तमेढ रोवली आहे.**

यंग टीचर्स असोसिएशनची स्थापना झुंजार प्राचार्य डॉ.बबनराव तायवाडे यांनी केली. विद्यापीठ स्तरावर प्राध्यापकांना न्याय मिळावा, त्यांना आत्मनिर्भरतेने जगता यावे व त्यांना आपली कार्यतत्पर सेवा देता यावी या उद्दात हेतूने त्यांनी संघटनेची स्थापना केली. सर्वांना समान संधी मिळावी हा समतेचा विचार डॉ.बबनराव तायवाडे व त्यांचे विश्वासू सहकारी असलेल्या डॉ. प्रदीप घोरपडे यांनी दिला. व्यक्तिगत सुखदुःखाकडे दुर्लक्ष करत त्यांनी संघटनेच्या कामात स्वतःला झोकून दिले. परिणामतः आज यंग टिचर्स प्राध्यापकांच्या मनात पोहचली आहे.

२०११ रोजी गोंडवाना विद्यापीठाच्या निर्मितीनंतर डॉ. प्रदीप घोरपडे यांनी गोंडवाना विद्यापीठ यंग टीचर्स असोसिएशनचा विस्तार केला. संघटना हीच आपल्या जीवनाची संपत्ती मानून संघटनेचे गोंडवाना विद्यापीठ स्तरावरील पहिले संस्थापक अध्यक्ष या नात्याने त्यांनी प्राध्यापक हितासाठी भरीव योगदान दिले. सेवानिवृत्त झाल्यानंतर संघटनेचे मार्गदर्शक व आधारस्तंभ बनले. गोंडवाना विद्यापीठात संघटनेची दुसरी सक्षम फळी निर्माण करून नव्या दमाच्या उपक्रमशील डॉ.संजय गोरे व डॉ. विवेक गोर्लावार यांच्याकडे संघटनेचे नेतृत्व दिले. एकूण ५६ नामवंत व विद्या व्यसंगी पदाधिकारी व विभाग समन्वयक असलेली एक मोठी कार्यकारिणी या संघटनेची आहे. या कार्यकारिणीने आपल्या सक्षम नेतृत्वात अनेक महाविद्यालयांचे व प्राध्यापकांचे प्रश्न सोडवले असून ही संघटना सर्व महाविद्यालयीन प्राध्यापकापर्यंत पोहोचली आहे. 'आपली संघटना आपल्या हक्काची संघटना' म्हणून गोंडवाना विद्यापीठाच्या परिक्षेत्रात या संघटनेने प्राध्यापकांच्या व विद्यार्थ्यांच्या हृदयात मौलिक स्थान मिळवले आहे. एक विश्वासपात्र बनली आहे.

संघटनेचे अध्यक्ष डॉ.संजय गोरे व सचीव डॉ.विवेक गोर्लावार यांनी संघटनेला उपक्रमशील व कार्य तत्पर ठेवत एकूण ६५ चे वर विद्यार्थी, प्राध्यापक हिताचे व समस्यांबाबत निवेदन विद्यापीठ प्रशासनस्तरावर, शिक्षणमंत्री स्तरावर, व सहसंचालक स्तरावर या संघटनेने दिली असून अनेक प्रश्न मार्गी लावले आहे. गडचिरोली सारख्या दुर्गम ग्रामीण आदिवासी व नक्षलग्रस्त भागातील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण प्राप्त व्हावे तसेच विविध क्षेत्रात प्राध्यापकांचा सर्वांगीण विकास व्हावा या हेतूने संघटनेने वेळोवेळी संघर्ष केला आहे. चंद्रपूर जिल्ह्यातील संसाधने, वनसंपत्ती, संस्कृती व आदिवासी परंपरा या सर्व घटकांना न्याय मिळवण्याच्या दृष्टीने संशोधन झाले पाहिजे ही आग्रही भूमिका संघटनेने मांडली. विद्यार्थ्यांना दर्जेदार संशोधन करता यावे यासाठी पीएचडी संशोधन प्रक्रियेतील अनेक अडचणी सोडवल्या. उदाहरणार्थ जुना प्रचलित नियम कायम केला, संशोधन प्रवेश प्रक्रिया, आराखडा, शुल्क याबाबत विशेष उल्लेख करता येईल. तसेच संशोधन केंद्रावर मार्गदर्शकांची व विद्यार्थ्यांची संख्या वाढवण्यामध्ये संघटनेचे महत्त्वाचे योगदान आहे. नुकतीच जागतिक स्तरावर आपत्ती ठरलेल्या संसर्गजन्य कोरोना साथरोग काळामध्ये विद्यार्थी व प्राध्यापकांच्या पाठीशी ही संघटना ठामपणे उभी राहिली असून विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क कमी करणे व महाविद्यालयीन कर्मचाऱ्यांची उपस्थिती मर्यादित करण्यासंदर्भात कुलगुरूंना निवेदन देऊन प्रश्न संघटनेने सोडवला आहे.



**डॉ. यशवंत घुमे**
**मो. ९८२२२३३९१२**

संघटना विविध प्रश्न व समस्यांसाठी प्राध्यापकाच्या पाठीशी खंबीरपणे उभी आहे. जुनी पेन्शन योजना, सातव्या वेतन आयोगाचे विविध हप्ते, नेट-सेट प्रभावित प्राध्यापकांना नियुक्तीपासून स्थाननिश्चिती मिळावी, एम. फिल धारण केलेल्या प्राध्यापकांना सेवेत संरक्षण व पदोन्नती लाभ मिळावा, पीएचडी मार्गदर्शकांना पीजी टीचर म्हणून मान्यता मिळावी तसेच प्राध्यापकांच्या स्थाननिश्चितीची देयतारीख मान्य करावी, २०१६ नंतर आचार्य पदवीप्राप्त अध्यापकांना वेतनवाढ मिळावी तसेच नोशनल, इन्क्रिमेंट प्राध्यापकांना प्राप्त व्हावे गोंडवाना विद्यापीठाच्या परिक्षेत्रात, अकॅडमी स्टाफ कॉलेज तसेच सहसंचालक (उच्च शिक्षण) यांचे कार्यालय स्थायी स्वरूपात निर्माण व्हावे यासारखे अनेकानेक प्रश्न शासन दरबारी व विद्यापीठस्तरावर या संघटनेने प्रखरपणे वेळोवेळी मांडलेले आहे.

शारीरिक शिक्षण व ग्रंथालयशास्त्र विषयाच्या संशोधन केंद्रासाठी संघटनेने पुढाकार घेतला. गोंडवाना विद्यापीठाच्या परिक्षेत्रामध्ये शारीरिक शिक्षण व ग्रंथालयशास्त्र विषयाकरिता संशोधन केंद्र अत्यल्प असल्याचे संघटनेच्या लक्षात येताच संघटनेने दोन्ही उपरोक्त विषयांसाठी संशोधन केंद्राची मागणी करून संशोधन केंद्र का आवश्यक आहे हे आपल्या भूमिकेतून गोंडवाना विद्यापीठाच्या कुलगुरूंना पटवून दिले. या दोन्ही विषयाच्या संदर्भात विद्या परिषदेमध्ये संशोधन केंद्र स्थापन करण्याच्या संदर्भामध्ये समिती गठित करण्यात आली. हे यश संघटनेचे असून या विषयावर संघटनेने अत्यंत तळमळीची भूमिका मांडली आहे.

शारीरिक शिक्षण व ग्रंथालयशास्त्र विषयक संशोधन केंद्र व्हावे यासंदर्भात संघटनेने मांडलेली भूमिका तसेच प्राध्यापकांसाठी अभ्यासेत्तर उपक्रम असलेली दिनदर्शिका निर्माण व्हावी याकरता केलेली मागणी लक्षात घेऊन कुलगुरूंनी संघटनेच्या विद्यापीठ विकासाच्या तळमळीची व कार्याची उपयुक्त विषयाच्या अनुषंगाने प्रशंसा केली. एका पत्राद्वारे संघटनेच्या संकल्पनेची व कार्याची भरभरून प्रशंसा केली आहे. हे गोंडवाना यंग टीचर्स संघटनेचे मोठे यश मानले जाते. आपल्या अनेक कामांनी प्राध्यापकांच्या घराघरात व मनात पोहचलेल्या या संघटनेचे प्राध्यापक विजयासाठी अहोरात्र परिश्रम घेत आहेत. यंग टिचर्सला मतदारांचा वाढता प्रतिसाद मिळत असून सी संघठना चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्यात प्रचारात आघाडीवर दिसते. या संघटनेतर्फे डॉ. मिलिंद भगत, डॉ. सतीश कन्नाके, डॉ.विवेक गोरलावार, डॉ. संजय गोरे, डॉ. अपर्णा मारगोनवार, डॉ सुधीर आकोजवार, डॉ. सुदर्शन दिवसे, डॉ.भास्कर लेनगुरे, डॉ. संजय साबळे, डॉ. ज्ञानेश्वर ठाकरे, डॉ.नंदाजी सातपुते, डॉ.रामदास कामडी, डॉ. राहुल सावलीकर हे निवडणुकीत उभे आहेत.

सह्याद्री चा राखणदार साप्ताहिक वृत्तपत्र मालक, प्रकाशक, संपादक आशीष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टिसव्हिसेस कर्मवीर वॉर्ड वरोरा येथून मुद्रित करून मातृछायाभवन कर्मवीर वॉर्ड वरोरा येथून प्रकाशित केले आहे. यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही. यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालयाअंतर्गत होईल.

A weekly newspaper `SAHYADRI CHA RAKHANDAR` printed by *Suraj Bhaktraj Ghume*, sahyandri multiservices, karmveer ward, warora 442907 (M.H) on behalf of Ashish Maroti Ghume owner, publisher & Editor of sahyadri cha rakhandar` matruchaya bhawan`, karmveer ward warora 442907(M.H). the editer may not be agree with the published content. in case any objection, the content will be redressed under warora court RNI NO : MAHMAR/2018/77866

CONTACT NUMBER :- Ashish Ghume 9011708840, Suraj Ghume 9673560360 EMAIL :- sahyandrinews@gmail.com EPAPER :- epaper.sahyandrinews.com